सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५६ | गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२६ फेब्रुवारी

- अपोलो कार्यक्रमः AS-201 चे प्रक्षेपण, सॅटर्न आयबी रॉकेटचे पहिले उड्डाण.
- व्ही. एस. खांडेकर यांना त्यांच्या 'ययाती' या कादंबरीसाठी मराठीतील पहिला ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- भारतीय उपग्रह 'इनसॅट-१-ई' राष्ट्राला समर्पित करण्यात आला.
- परळी-वैजनाथ औष्णिक वीज प्रकल्पाने एकाच दिवसात १४,७०९ दशलक्ष युनिट वीज निर्मिती करून (भारतात आणि त्यावेळी) वीज निर्मितीचा एक नवा विक्रम प्रस्थापित केला.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# पालिकेची पहिली सभा म्हणजे

# अंगुरका दाना..कुछ खट्टा था कुछ मिठा था!

## डॉ. डिगंबर महालेंनी सांगितला आँखों देखां 'हाल' व अविस्मरणीय अनुभव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी झाली. ही सभा सुमारे ४ तास चालली. सभेतील गरमा-गरमी अल्पावधीतच शहरभर पसरली. त्यामुळे अनेक जण पालिका इमारतीच्या खिडकीतून तथा दरवाजाच्या फटीतून सभा पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी सभास्थळी पोहोचले. मात्र, सर्वांनाच पूर्ण सभा ऐकता तथा पाहता आली नाही. शहरभर सर्वत्र या सभेची जोरदार चर्चा आहे. नेमके काय घडले? याबाबत खरी माहिती दै. ग्लोबल महातेजने द्यावी, अशी अनेकांनी आमच्याकडे इच्छा व्यक्त केली. त्यामुळे या सभेचे मॅन ऑफ दी मॅच म्हणून ज्यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे असे नगरसेवक डॉ. डिगंबर महाले यांच्याशी झालेला वार्तालाप असा..




डॉ. महाले यांनी सांगितले, की प्रेमात आणि युद्धात सर्व काही क्षम्य असते. राजकारण त्याचाच एक भाग आहे. कोणत्याही क्षेत्रात सत्ताधारी त्यांच्या मर्जीप्रमाणे कारभार चालावा यासाठी प्रयत्न करतात. मात्र, अशावेळी विरोधकांनी लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आपली प्रखर, प्रबळ, लोकाभिमूख व अभ्यासूवृत्तीने सत्ताधाऱ्यांशी मर्दानी सामना करायचा असतो. अर्थात त्यात व्यक्तिद्वेष किंवा दुष्मन दावा नसावा. मंगळवारच्या सभेत असेच काहीसे झाले. अजेंडा व टिपण्या अत्यंत संदिग्ध व संशयास्पद होत्या. त्यातच शहर विकास आघाडीकडे कोणीतरी आजची सभा पाच मिनिटात गुंडाळली जाणार आहे, असा निरोप पोहोचविला होता. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या मनमानी चालू द्यायची नाही, खमकी भूमिका घ्यायची, आपल्या प्रत्येक प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळत नाही तोपर्यंत सभा चालवायची असे आम्ही ठरवूनच पालिकेत शिरलो. लोकनेते तथा माजी उपमुख्यमंत्री (स्व.) अजितदादा पवार व अन्य मान्यवरांच्या मृत्यूमुळे श्रद्धांजलीच्या विषयाबाबतचे औदासिन्य पाहून मी अत्यंत संतप्त प्रतिक्रिया दिल्या. मात्र, मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी यापुढे काळजी घेतली जाईल, असे अभिवचन दिल्याने वादावर पडदा पडला. अनेक विषयांवर शहर विकास आघाडीच्या सर्वच नगरसेवकांनी अत्यंत आक्रमक व जागरूक लोकप्रतिनिधींच्या भूमिकेतून सत्ताधाऱ्यांना आगामी काळ कसा राहील? याची जाणीव करून दिली आहे. खरे तर सत्ताधारी पक्षातील सर्वच नगरसेवक शविआतील नगरसेवकांचे अतिशय चांगले मित्र आहेत. अनेकांचे कौटुंबिक जिव्हाळ्याचे संबंध आहेत. त्यामुळे अनेकदा चकमकी उडाल्या पण तितकेच हास्याचे फवारेही उडाले. कोणताही वाद विकोपाला गेला नाही. कोणीही कोणाला अपशब्द बोलला नाही. जसा वेळ मिळेल तसा व प्रसंग पाहून सर्वजण एकमेकांशी मोकळेपणाने बोलतही होते. जनहिताच्या व पालिकेच्या हिताच्या तसेच अत्यावश्यक व औपचारिक विषयांबाबत सर्वांचे पटकन एकमतही होत होते. जेव्हा- जेव्हा वाद विकोपाला जात होते, त्या- त्या वेळी उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, नगरसेवक महेश देशमुख, दादा पवार, मोहन सातपुते मध्यस्थीची यशस्वी भूमिका निभावत होते. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनीही वातावरण खेळीमेळीचे राहावे यासाठी अत्यंत संयमशिर भूमिका ठेवली. त्यांनी सर्वांना बोलण्याची संधी दिली. प्रारंभी एक नगरसेवक बोलायला उभा राहिल्यानंतर त्याच्या प्रश्नाला नगराध्यक्ष किंवा मुख्याधिकारी यांनी उत्तर देण्याऐवजी सत्ताधारी गटाचे नगरसेवक उत्तरे देत होते. त्यावर प्रश्नकर्ते तीव्र आक्षेप घेत होते. त्यातून वाद विकोपाला जात होते. त्यावर मी सर्वांना विनंती करून एकावेळी एकच जण बोलेल असे आवाहन केल्यानंतर सभा संपेपर्यंत सर्वांनी काटेकोरपणे माझ्या आवाहनाला पुरेपूर प्रतिसाद दिला. परिणामी वादांवर लवकर पडदा पडत गेला. सभेविषयी काहींनी पसरविलेल्या खोट्या बातम्या हास्यास्पद आहेत.

नगराध्यक्षा राहिलेल्या सौ. जयश्रीताई पाटील आणि शविआच्या नगरसेविकांना जेव्हा पाठीमागे बसविण्यात आले तेव्हा आम्हा सगळ्यांनाच खूप वाईट वाटले आणि संतापही आला. सौ. जयश्रीताई पाटील यांनी याबाबत जोरदार आक्षेप घेतला. मात्र, या वादावरून पडलेल्या ठिणगीचा वणवा होण्याच्या आतच नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनी यापुढे सन्मानपूर्वक जागेवर बसविले जाईल, असे सौ. जयश्रीताईंना सांगून वाद मिटविला. खरे तर असे व्हायला नको होते.

पहिलीच सभा असूनही अनेक तरूण व अननुभवी नगरसेविकांनी त्यांच्या समस्या मांडल्या. प्रसंगी त्या संतप्तही झाल्या. मात्र, त्यांनी आवाज उठविला ही बाब अत्यंत समाधानकारक व सभागृह आणि लोकशाहीसाठी पूरक आहे. वादाचे अनेक प्रसंग घडले. मात्र, सर्वच जण परस्परांचे मित्र असल्याने कोणी मनाला लावून घेवून टोकाच्या भूमिका घेतल्या नाहीत. सभा संपल्यानंतर बाळू कोठारी यांच्याकडे जवळपास सर्वच सभागृह भोजनासाठी गेले होते. तेव्हा सर्वच जण एकत्र बसले होते. कोणताही वादाचा विषय न करता सर्वांमध्ये हास्य विनोद रंगले. भविष्यात सभेत वाद होवू नयेत, यासाठी सभेपूर्वी दोन्ही गटांचे निवडक प्रतिनिधींनी एकत्र बसून चर्चा करावी असे यापूर्वीही ठरले होते. कालही हीच बाब पुन्हा चर्चिली गेली. दोन्ही गटांमध्ये समन्वय राहिल्यास भविष्यात विकासकामे व प्रगतीची घोडदौड वेगवान राहील. अन्यथा सर्वांनाच अनेक बाबी त्रासदायक ठरतील. अगदी मोजक्या शब्दात सांगायचे झाल्यास पहिली सभा द्राक्षाप्रमाणे थोडी खट्टी होती आणि थोडी गोडही होती. सभेत कोणी जिंकलेही नाही आणि कोणी हारलेही नाही.



## यंदा फेब्रुवारी अखेरच लागली उन्हाळ्याची चाहूल

पान २ वर

## डोळ्यात मिरची पावडर फेकून व्यापाऱ्याचे साडेपाच लाख रुपये लांबवले

### पिंपळे रस्त्यावरील घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्कुटीवर जाणाऱ्या व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरची पावडर फेकून साडेपाच लाख रुपयांची पिशवी अज्ञात चोरट्याने लांबविली आहे. ही घटना बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी पिंपळे रस्त्यावर घडली. बाजार समितीचे व्यापारी यतीन कोठारी हे स्कुटीवरून पिंपळे रस्त्यावरील लामा जीनमध्ये जात होते. रस्त्यावर तीन जण मोटरसायकलवर तोंडाला मास्क लावून आले आणि त्यांनी यतीन कोठारी यांचा चष्मा काढून फेकला. त्यानंतर त्यांच्या डोळ्यात मिरची पावडर फेकली. यावेळी त्यांच्याजवळील साडेपाच लाख रुपयांची पिशवी खाली पडली. चोरटे ती पिशवी घेऊन पसार झाले. व्यापारी कोठारी यांनी पोलिसांना कळविल्यानंतर पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी चोरट्यांच्या शोधासाठी पथक रवाना केले आहे. दरम्यान, याबाबत पोलिसांत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

### ग्रामीण रुग्णालय सनियंत्रण व सल्लागार समिती

# नगरसेवक डॉ. डिगंबर महाले यांची सदस्यपदी निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे अवर सचिव संजय महाडेश्वर यांनी ३ डिसेंबर २०२५ रोजी आदेशान्वये येथील ग्रामीण रुग्णालय सनियंत्रण व सल्लागार समितीची रचना करण्यासंदर्भात सूचित केले होते. त्यानुसार येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक वर्ग-१ यांनी सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी समितीची रचना केली. त्यात येथील नगरसेवक डॉ. डिगंबर विठ्ठल महाले यांची सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.



सदर सनियंत्रण व सल्लागार समितीची करण्यात आलेली रचना पुढीलप्रमाणे. अध्यक्ष : आमदार अनिलदादा भाईदास पाटील, सदस्य : पंचायत समितीचे दोन सदस्य तथा प्रशासक, नगरसेवक डॉ. डिगंबर विठ्ठल महाले, अशासकीय संस्थेच्या (एनजीओ) प्रतिनिधी डॉ. भारतीताई पाटील, सामाजिक कार्यकर्ते (महिला)- सौ. पद्मजा रवींद्र पाटील, (पुरुष)- विक्रांत भास्करराव पाटील तसेच समितीतील पदसिद्ध शासकीय सदस्य : मा. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, जळगाव, मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर, मा. उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर, मा. पशुसंवर्धन अधिकारी, अमळनेर, मा. तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर, तसेच सदस्य सचिव : मा. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, अमळनेर, जि. जळगाव यांचा समावेश आहे.

## सिरोक्यूमुलस ढगांमुळे पाऊस, गारपिटीची शक्यता कमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यात गेल्या काही तासांपासून आकाशात अचानक ढगांची गर्दी झाल्याने नागरिकांमध्ये अवकाळी पाऊस किंवा गारपिटीची धाकधूक निर्माण झाली होती. मात्र, हे ढग पावसाचे नसून ते उच्च स्तरावरचे सिरोक्यूमुलस प्रकारचे ढग आहेत. त्यामुळे शहरास जिल्ह्यात पावसाची कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट झाले आहे. हवामान अभ्यासकांच्या मते, दक्षिण सौराष्ट्रजवळ एक चक्रीय वातवरणीय प्रणाली विकसित झाली आहे. त्यामुळे हवेतील ओलावा वाढला आहे. आकाशात थंड हवा आणि ओलावा यांच्या मिश्रणामुळे हे पांढरे, लहरी आणि पसरलेले ढग तयार झाले आहेत.

# बोरी नदीवरील पुलावर अवजड वाहनांची 'पार्किंग'

## पोलीस, पालिका प्रशासनाने कारवाईची गरज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील बोरी नदीच्या पुलावर काही दिवसांपूर्वी विक्रेत्यांनी हातगाड्या व लोऱ्या लावून केलेले अतिक्रमण प्रशासनाने हटवले होते. पुलाने मोकळा श्वास घेतल्याचे चित्र दिसून आले होते. मात्र, आता त्याच ठिकाणी अवजड वाहनांचे बेकायदेशीर पार्किंग सुरू झाल्याचे दिसून येते. परिणामी वाहतुकीचा खोळंबा होत असतो. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी याबाबत संताप व्यक्त केला आहे. पोलीस व पालिका प्रशासनाने कारवाई करण्याची गरज आहे.



या महत्त्वाच्या मार्गावर ट्रक व इतर मोठी वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. भरधाव जाणाऱ्या अवजड वाहनांमुळे दुचाकी, पादचाऱ्यांना सहन करावे लागत आहे. विशेषतः सकाळ व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत दुचाकी, रिक्षा व चारचाकी वाहनचालकांना मार्ग काढताना कसरत करावी लागत आहे. परिणामी अपघाताचा धोका वाढल्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, विक्रेत्यांवर तत्काळ कारवाई करण्यात आली. मात्र, अवजड वाहनांवर कारवाई का होत नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पुलावर तासंतास तसेच दिवसभर वाहन उभे करणे हे वाहतूक नियमांचे उल्लंघन असून, संबंधित विभागाने तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. वाहतूक पोलीस शाखेने व पालिकेने संयुक्त मोहीम राबवून पुलावरील अडथळे दूर करणे गरजेचे आहे.

# बर्फ टाकलेल्या शितपेयाचा आनंद घेताय, तर सावधान !


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : सध्या फेब्रुवारी अखेरच उन्हाचा चटका चांगला जाणू लागला आहे. त्यामुळे सर्वच रस्त्यांवर आपल्याला शीतपेये, बर्फाचा गोळा विविध आइस्क्रीम विक्री करताना विक्रेते दिसत आहेत. मात्र, तात्पुरता थंडावा मिळण्यासाठी असलेले हे शीतपेय, आइस्क्रीम यांमध्ये असलेला बर्फ किती चांगला आहे हे बघणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

मुळात बर्फ हा शरीरासाठी उष्ण समजला जातो. तसेच बाजारात उपलब्ध असलेल्या शीतपेयांमध्ये विविध रसायनांचा वापर केला जातो. ही रसायने आरोग्याला अपायकारक ठरतात. बाजारात उपलब्ध असलेल्या बर्फाचा अनेक ठिकाणी वापर करण्यात येतो. यामधील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे हा बर्फ तयार करताना वापरण्यात येणारे साचे, पाणी तसेच तो बर्फ बाजारात आणताना होत असलेली वाहतूक किती स्वच्छ आहे, हे महत्त्वाचे आहे. त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने अशा बर्फाच्या वाहतुकीने नागरिकांमध्ये आजार बळावत आहेत. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत तात्पुरते आल्हाददायक वाटणारे ज्यूस, बर्फाचे गोळे, आइस्क्रीम टाळावे असा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञ देतात.

या आजारांची शक्यता

शीतपेयांमध्ये सोड्याचे प्रमाण जास्त असल्याने ते आरोग्यासाठी घातक असते. त्यामुळे तोंडाचे आरोग्य बिघडते. दातांवर शीतपेयांचे थर





साचल्याने दात लवकर किडतात. त्याचप्रमाणे हाडांमध्ये असणाऱ्या खनिजांवर सोड्याचा वाईट परिणाम होतो. त्यामुळे हाडे ठिसूळ होतात आणि वारंवार फ्रॅक्चर होण्याची शक्यता असते. तसेच शीतपेयांमध्ये असणाऱ्या कॅफीनमुळे शरीरातील कॅल्शियम लघवीवाटे शरीराबाहेर जाते. त्यामुळेही हाडांना पुरेसे पोषण न मिळाल्याने ती ठिसूळ होतात. यातील सोड्याच्या प्रमाणामुळे वजन वाढण्याची समस्या निर्माण होते. त्यामुळे जे लोक जास्त प्रमाणात शीतपेये घेतात, त्यांच्यात लठ्ठपणाची समस्या आढळून येते. लठ्ठपणामुळे मधुमेह आणि इतरही अनेक समस्या उद्भवण्याची शक्यता असते.

असा तयार होतो बर्फ

बर्फ तयार करणाऱ्या फॅक्टरीमध्ये मशीन सुरू करून बर्फ तयार करण्याची प्रक्रिया सुरू होते. याठिकाणी असलेले यंत्र गोठवणाऱ्या वायूला थंड करतो. हा थंड वायू मोठ्या टाकीमध्ये साठविला जातो, जो एका वेळी अनेक बर्फाच्या लाद्या गोठवू शकतो. बर्फाचे साचे बुडविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्यात मीठाचे अनेक तुकडे जोडले जातात. त्यानंतर साचे स्वच्छ केले जातात आणि मीठ विरघळलेल्या पाण्यात साचे ओळीने ठेवले जातात. खाऱ्या पाण्यात साचे सलग टाकल्यानंतर ते पाण्याने भरले जातात. त्यानंतर, खाऱ्या पाण्याखालून जाणाऱ्या कूलिंग कॉइलमधून थंड वायू सोडला जातो. त्यामुळे खारट पाणी थंड होते आणि त्याच्या थंडपणामुळे साच्यात भरलेल्या पाण्याचा बर्फ तयार होतो. त्यानंतर हूकच्या साहाय्याने हे साचे बाहेर काढले जातात.

## संपादकीय

# आयात शुल्काचे हत्यार झाले बोथट!

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचा भारतासह अनेक देशांवर आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय, ही अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानी कारभाराला दिलेली चपराक आहे. आपत्कालीन कायद्याचा आधार घेऊन अनेक देशांवर आयातशुल्क लागू करण्याचा सपाटा ट्रम्प यांनी लावला होता; या निर्णयाने त्याला वेसण घातली. सन १९७७ च्या 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकॉनॉमिक पॉवर्स ॲक्ट'चा वापर ट्रम्प यांनी त्यासाठी केला होता. मात्र, अध्यक्षांना तसा अधिकार नसल्याचा निर्णय न्यायालयाने सहा विरुद्ध तीन अशा बहुमताने दिला. यामुळे अहंकार दुखावलेले ट्रम्प हा निर्णय सहजी स्वीकारणार नसल्याचेच त्यांच्या भूमिकेवरून दिसते. त्यांनी नव्याने १५ टक्के अतिरिक्त व्यापार शुल्क लागू केलेच; त्यासह काँग्रेसची मान्यता मिळवून अथवा अन्य वेगवेगळ्या कायद्यांचा आधार घेऊन ते सध्याची शुल्करचनाही कायम ठेवण्याचा प्रयत्न करतील. हे असले, तरी विविध देशांना अनिश्चिततेच्या गर्तेत लोटून गेले वर्षभर साऱ्या जगाला वेठीस धरणारे ट्रम्प यांचे लेखणीच्या एका फटकाऱ्याद्वारे उपसले जाणारे आयात शुल्काचे हत्यार न्यायालयाच्या या निर्णयाने बोथट झाले, हे निर्विवाद. अंतिम टप्प्यावर असलेल्या भारत-अमेरिका यांच्यातील व्यापार करारावर या निर्णयाचे काय परिणाम होणार आणि बदललेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन भारत नव्याने वाटाघाटी करणार का, ही आता उत्सुकतेची बाब आहे.

जागतिक व्यापार आणि धोरणात्मक संबंध या खरेतर गंभीरपणे हाताळण्याच्या बाबी; पण मुळातच लहरी कारभारासाठी प्रसिद्ध असलेले ट्रम्प यांच्या हाती आलेल्या आयात शुल्कनामक हत्याराचा गेले वर्षभर त्यांनी खेळण्यासारखाच वापर केला. कधी द्विपक्षीय व्यापारातील अनुशेष भरून काढण्याच्या निमित्ताने, तर कधी रशियन तेलाची खरेदी करतो आणि युद्धाला मदत करतो, असा ओरडा करून त्यांनी भारतावरही एकूण ५० टक्के आयात शुल्क लादले होते. आयात शुल्काद्वारे दबावतंत्र वापरून आपल्या अटी त्यांनी अनेक देशांच्या गळी उतरवल्या. चीनसारख्या देशांनी फणा उगारल्यानंतर त्यांनी माघारही घेतली. आणीबाणीच्या प्रसंगी वापरले जाणारे आर्थिक अधिकार शांतता काळात वापरता येणार नाहीत, हा मूळ भारतीय अमेरिकी नागरिक नील कत्याल यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला. या निर्णयानंतरही आपला हेका सोडणार नसल्याचे ट्रम्प यांनी न्यायमूर्तींवरच टीका करून दाखवून दिले आहे. त्यांनी लागू केलेल्या १५ टक्के अतिरिक्त शुल्काचीही मुदत सहा महिन्यांचीच आहे. आता पूर्वी लागू केलेल्या शुल्कविषयक तरतुदींना मान्यता घेण्यासाठी त्यांना काँग्रेसपुढे जावे लागेल. मात्र, खुद्द रिपब्लिकन पक्षातही आयातशुल्काला अनेकांचा विरोध आहे. या मंथनातून नेमके काय समोर येणार, याविषयी संभ्रम आहे; तसेच 'बेकायदा' वसूल केलेल्या सुमारे १३३ अब्ज डॉलरच्या शुल्काचा परतावा देण्याबाबत न्यायालयाने काही भाष्य केलेले नाही.


कायद्यानुसार आजवर काँग्रेसने मान्य केलेले आयात शुल्क आणि १० टक्के इतके अतिरिक्त शुल्क सध्या तरी लागू असल्याचे 'व्हाइट हाऊस'च्या प्रवयांचे म्हणणे ट्रम्प हे जोवर नवा अगोचरपणा करीत नाहीत, तोवर सत्य मानावे लागेल, असे दिसते. भारताविरोधातही ट्रम्प यांनी आयात शुल्काचा मनमुराद वापर केला. भारत-अमेरिका व्यापारकरारातील तरतुदींबाबत विशेषतः भारतीय मालावर १८ टक्के आणि अमेरिकी मालावर शून्य टक्के आयातशुल्काबाबत ट्रम्प यांनी केलेले भाष्य पाहता, हा करार अमेरिकेच्या फायद्याचा आणि एकतर्फी असल्याची टीका विरोधकांकडून सुरू आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतरही 'भारत-अमेरिका करार कायम आहे. अमेरिका शुल्क देणार नाही आणि भारत देणार आहे,' या ट्रम्प यांच्या विधानाने त्यात भरच पडणार आहे. अमेरिकी न्यायालयाचा निर्णय एका अर्थाने भारताच्या पथ्यावर पडणारा आहे. त्यामुळे बदललेल्या संदर्भांनुसार ट्रम्पप्रणित शुल्कपूर्व स्थिती गृहीत धरून आणि अद्याप अंतिम न झालेल्या कराराबाबत दबाव झुगारून अधिक आक्रमकपणे वाटाघाटी करण्याची वेळ आली आहे. मात्र, एपस्टिन फाइलवरून होणारी टीका, गाझा शांतता मंडळावरून मतमतांतरे आणि इराणवर हल्ल्यांची तयारी अशा परिस्थितीत न्यायालयाच्या निर्णयाने कातावलेले आडमुठे ट्रम्प पोतडीतून नवे कोणते अस्त्र बाहेर काढणार, याचाही विचार करणे गरजेचे ठरते.

# यंदा फेब्रुवारी अखेरच लागली उन्हाळ्याची चाहूल

## अमळनेरसह परिसरात पारा पोचला ३५ अंशावर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या तीन ते चार दिवसांपासून येथे व परिसरात उन्हाचा पारा उंचावला आहे. फेब्रुवारीतच अखेरच्या आठवड्यात उन्हाळ्याची चाहूल आता लागू लागली आहे. परिणामी नागरिक उन्हामुळे त्रस्त झाल्याचे दिसून येत आहे. कमाल तापमानाचा पारा ३५ अंशावर गेला आहे. किमान तापमानानेही २० अंशापर्यंत मजल मारली आहे. येत्या चार ते पाच दिवसांत अजून पारा उंचावण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.



गेल्या आठवड्यापर्यंत पहाटे जाणवणाऱ्या थंडीने जिल्ह्यातून काढता पाय घेतला आहे. सकाळी १० वाजल्यापासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे. या आठवड्यात पहिल्या दिवशी जळगावचे कमाल तापमान ३२ अंश तर रात्रीचे किमान तापमानही १५ अंश सेल्सिअसच्या घरात होते. त्यामुळे रात्री आणि पहाटे काहीशी थंडी जाणवत होती. मात्र, गेल्या चार ते पाच दिवसांत तापमानात कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे थंडी आता ओसरली असून, उन्हाळ्याची चाहूल लागली आहे. बुधवार, दि. २५ फेब्रुवारी रोजी अमळनेरचे कमाल तापमान ३४. ५ अंश तर किमान तापमान १८. ४ अंश सेल्सिअस इतके होते. उकाड्यात वाढ झाल्याने अमळनेरकर हैराण झाले आहेत.

दरम्यान अशातच २५ ते २८ फेब्रुवारीदरम्यान अमळनेर तालुक्यासह जिल्ह्यातील हवामान मुख्यतः स्वच्छ आणि कोरडे राहणार असून, कमाल तापमानाचा पारा ३४ ते ३६ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीच्या उत्तरार्धातच वाढणाऱ्या उष्णतेमुळे यंदा उन्हाळा लवकर सुरू होण्याचे संकेत मिळत आहेत.

# हॉटेलचे बिल भरले नाही

## पाकिस्तानी हॉकी संघ आला रस्त्यावर

**ग्लोबल महातेज परिवार**

आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानची पुन्हा एकदा नाचक्की झाली आहे. ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेरा येथे पाकिस्तानच्या राष्ट्रीय हॉकी संघातील खेळाडूंना अक्षरशः रस्त्यावर थांबावे लागले.




वृत्तानुसार ज्या हॉटेलमध्ये संघाची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती त्याचे बिल पाकिस्तान हॉकी महासंघाने भरले नव्हते. वेळेत देयक न भरल्यामुळे हॉटेल बुकिंग रद्द करण्यात आले. कॅनबेराला पोहोचल्यावर खेळाडूंना कळले, की त्यांच्या खोल्यांची नोंदणी रद्द झाली आहे. परिणामी, संघाला अनेक तास रस्त्यावरच थांबावे लागले. पाकिस्तानचा हॉकी संघ सध्या ऑस्ट्रेलियातील हॉबार्ट येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाच्या प्रो लीगच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दौऱ्यावर आहे. आधीच कामगिरीबाबत संघर्ष करत असलेल्या संघाने या स्पर्धेत आतापर्यंत एकही सामना जिंकलेला नाही.

प्रो. लीगमधील सहाही सामने पाकिस्तानने गमावले आहेत. वृत्तानुसार खेळाडू आणि व्यवस्थापनासाठी कॅनबेरातील चार-तारांकित हॉटेलमध्ये खोल्या बुक केल्याचे आणि बिल भरल्याचे सांगण्यात आले होते. मात्र संघ पोहोचल्यावर बिल न भरल्यामुळे बुकिंग रद्द झाल्याचे स्पष्ट झाले. वेळेतील फरकामुळे प्रशिक्षक ताहिर झमान यांना हॉकी महासंघाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधता आला नाही. लाहोरहून दीर्घ प्रवास करून आलेल्या खेळाडूंना विश्रांतीसाठी जागाच नव्हती. अनेक तासांनंतर हॉटेल कर्मचाऱ्यांनी थकलेल्या खेळाडूंना काही खोल्या उपलब्ध करून दिल्या. मात्र खोल्या मर्यादित असल्याने दोन-तीन खेळाडूंना एकाच खोलीत राहावे लागले. दुसऱ्या दिवशी पाकिस्तानचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध २-३ असा पराभव झाला.

या दौऱ्यावर पाकिस्तान संघ नियमित व्यवस्थापकाविना आहे. माजी ऑलिम्पियन अंजुम सईद यांना विमान प्रवासादरम्यान धूम्रपान केल्याच्या आणि विमानतळ कर्मचाऱ्यांशी वाद झाल्याच्या आरोपानंतर महासंघाने पदावरून हटविले होते. स्थानिक पाकिस्तानी नागरिकांकडून आर्थिक मदत मिळाल्यानंतर अखेर संघाला हॉटेलचे बिल भरता आल्याचेही वृत्त आहे. आर्थिक अडचणींमुळे संघाला फटका बसण्याची ही पहिली वेळ नाही. अर्जेंटिनामध्ये झालेल्या एफआयएच प्रो लीगच्या पहिल्या टप्प्यातही निधीअभावी खेळाडूंना रोजचे भत्ते मिळाले नव्हते, अशी माहिती आहे.

## मोटारसायकल घसरून पडल्याने महिलेचा मृत्यू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मोटरसायकल घसरून खाली पडल्याने उपचारादरम्यान एका महिलेचा मृत्यू झाला आहे. ही घटना २८ डिसेंबर रोजी तालुक्यातील उदयनगर येथे घडली होती. याप्रकरणी येथील पोलीस ठाण्यात दोन महिन्यानंतर चालकाविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. लताबाई बाळू बडगुजर (वय ४५ रा. पिंपळकोठा बुद्रुक, ता. एरंडोल) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे. धरणगाव येथील तेली तलावाजवळील रहिवासी पांडुरंग हरिनाथ महाजन हे तीर्थ यात्रेचे आयोजन करतात. तिर्थयात्रेचे पैसे घेण्यासाठी ते दोघे डबलशीट मोटरसायकलने (एमएच१९बीडब्ल्यू ५५५६) धुळे व पिंपळनेर येथे गेले होते. परत येतांना उदयनगरजवळ मोटारसायकल घसरून दोघे खाली पडले.यात लताबाईंचा मृत्यू झाला.

## 'आवाजात दम नाही' म्हणून नाकारले,

# पण त्याच आवाजाने अमजद खान यांना बनवले 'शोले'चा अजरामर गब्बर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'शोले' या चित्रपटात गब्बर सिंगची भूमिका साकारणाऱ्या अमजद खान यांच्या आवाजाला सुरुवातीला चित्रपटाच्या लेखकांनी कमकुवत समजून नाकारले होते. पण हाच आवाज त्यांच्या व्यक्तिरेखेला आजही जीवंत ठेवतो. हिंदी सिनेसृष्टीच्या इतिहासात जर एखाद्या खलनायकाने नायकांपेक्षा अधिक प्रसिद्धी मिळवली असेल, तर तो अमजद खानच होता. १९७५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'शोले'मधील त्यांचा गब्बर सिंग आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे. मात्र गंमत म्हणजे ज्या भरड, कर्कश आणि रांगड्या आवाजाने गब्बर अजरामर झाला त्याच आवाजाला सुरूवातीला चित्रपटाच्या लेखकांनी नकार दिला होता. 'शोले'ची कथा लिहिणाऱ्या प्रसिद्ध जोडीने सलीम खान आणि जावेद अख्तर गब्बरला कागदावर अत्यंत भयावह आणि प्रभावी स्वरूप दिले होते. असे सांगितले जाते, की सुरूवातीच्या स्क्रीन टेस्टदरम्यान अमजद खानचा आवाज ऐकून त्यांना वाटले की हा आवाज



**रिजेक्शनपासून दंतकथेपर्यंत : गब्बर सिंग बनण्यामागची अमजद खान यांची कहाणी**

या व्यक्तिरेखेसाठी योग्य नाही. त्यांना अमजद खानचा आवाज थोडा पातळ आणि नाकातून येणारा वाटला, जो एखाद्या ताकदवान खलनायकाच्या अपेक्षित जड आवाजापेक्षा वेगळा होता. मात्र दिग्दर्शक रमेश सिप्पी यांनी त्या आवाजातील वेगळेपण ओळखले आणि अमजद खॉनला संधी दिली. संवादफेक, थांबे (पॉज) आणि व्यक्तिमत्त्वावर काम करण्याची. इथूनच गब्बर सिंगच्या प्रवासाची खरी सुरूवात झाली.

### अशी केली होती तयारी

अमजद खान यांनी गब्बरचा आवाज फक्त उंच किंवा दमदार करण्याचा प्रयत्न केला नाही, तर त्यात एक विचित्र, क्रूरता मिसळली. "कितने आदमी थे?", "अरे ओ सांभा..." आणि "जो डर गया, समझो मर गया" या संवादांमधील त्यांचा ठहराव, शब्द चावून-चावून बोलण्याची शैली आणि अचानक उसळणारं हसणं या सगळ्यांनी गब्बरला भयानक आणि अविस्मरणीय बनवले. याच कारणामुळे सलीम-जावेद यांनी त्यांना आधी नाकारले होते, तोच आवाज पुढे गब्बरची ओळख ठरला. जर त्यांचा आवाज इतरांसारखाच असता, तर कदाचित ही व्यक्तिरेखा गर्दीत हरवली असती. अमजद खान यांनी सिद्ध केले, की अभिनय फक्त आवाजाच्या जडपणावर नाही, तर त्या आवाजाचा योग्य वापर करण्याच्या कलेवर अवलंबून असतो.

### जेव्हा खलनायक नायकांपेक्षा मोठा ठरला

'शोले'मध्ये अमिताभ बच्चन आणि धर्मेंद्र यांसारखे मोठे नायक असतानाही, गब्बरचा प्रभाव इतका खोलवर रुजला की तोच चित्रपटाचा सर्वाधिक चर्चेतला चेहरा बनला. लहानांपासून मोठ्यांपर्यंत गब्बरचे संवाद दैनंदिन भाषेचा भाग झाले. दशकानुदशके उलटून गेल्यानंतरही गब्बरचे आसुरी हसणं आणि त्याची शैली आजही लोक नक्कल करतात.

### अमजद खानचा आवाज ठरला अविस्मरणीय

फार कमी लोकांना माहिती आहे, की अमजद खान यांना ही भूमिका मिळवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला होता. चित्रपटाच्या सुरुवातीला इतर नावांचाही विचार करण्यात आला होता. पण नशिबाने साथ दिली आणि ज्या अभिनेत्याच्या आवाजाला आधी कमजोरी मानलं गेलं होतं, त्यालाच मंच मिळाला. तोच आवाज पुढे हिंदी सिनेमातील सर्वात भीतीदायक आणि लोकप्रिय आवाजांपैकी एक ठरला.

### 'शोले' ठरला टर्निंग पॉइंट

'शोले'मुळे अमजद खान यांच्या करिअरला नवी दिशा आणि उंची मिळाली. या चित्रपटाने त्यांना केवळ व्यावसायिक यशच दिलं नाही, तर वैयक्तिक आयुष्यातही मोठा आधार दिला. रमेश सिप्पी यांचा हा चित्रपट साइन करण्याच्या अगदी आधी अमजद खान अत्यंत कठीण काळातून जात होते. मुलाच्या जन्मावेळी रुग्णालयाचे बिल भरण्यासाठीसुद्धा त्यांच्याकडे पैसे नव्हते. 'शोले'ने त्यांच्या आयुष्याचा प्रवासच बदलून टाकला.

# वानवडीतील शिंदे समाधी छत्री संपूर्ण हिंदुस्थानासाठी प्रेरणा व ऊर्जास्त्रोत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

"सोडूनि सारा राज्य पसारा निघून गेले शिवपुरा"
"पाटीलबाबा महापराक्रमी म्हणून कीर्ती दिगंतरा"

उत्तर हिंदुस्थानातील सत्ताधीशांवर आपला वचक बसविल्यानंतर महादजीबाबांना दक्षिणेत मराठा साम्राज्याच्या सीमेवर लुडबूड करणाऱ्या इंग्रजांना चांगलीच अद्दल घडवायची होती. दिल्लीवर भगवा फडकवून उत्तर हिंदुस्थानची सूत्रे पाटीलबाबांनी आपल्या हाती घेतल्यानंतर ते महाराष्ट्रात आले. पुण्यात वानवडी येथे महादजीबाबांनी आपल्या फौजेसह तळ ठोकला. वानवडी या ठिकाणी महादजीबाबांनी आपला बराच काळ घालविला.





पाटीलबाबांनी इंग्रजांना हिंदुस्थानातून कायमचे हाकलून लावण्याचा चंगच बांधला होता. परंतु दुर्दैव हे की त्यांना अपेक्षित अशी साथ कोणाकडून मिळाली नाही उलट धूर्त नाना फडणवीस व इतर महाभागांनी अखंड हिंदुस्थानातील पाटीलबाबांचा वाढता प्रभाव पाहून कटकारस्थाने करायला सुरूवात केली. मराठ्यांचे भविष्यातील मुख्य शत्रू इतर सत्ताधीश नसून इंग्रज आहेत हे वेळोवेळी सांगणाऱ्या महादजीबाबांवर इंग्रजांची मदत घेऊन नाना फडणविसाने कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राला आपल्या नेतृत्वाखाली एक दिशा देऊन मराठा साम्राज्य एक बलाढ्य व वैभवशाली करण्याचे स्वप्न उराशी बाळगून दक्षिणेत उतरलेल्या पाटीलबाबांना जर तलवारबहाद्दर सरदारांची, हुशार व मराठा साम्राज्याचे हित जोपासणाऱ्या मुसद्दी मंडळींची साथ मिळाली असती तर पुढील येणारा भविष्यकाळ संपूर्ण हिंदुस्थानासाठी वेगळा असता.

हे सर्व राजकारण चालू असताना १७९३ च्या मे महिन्यापासून महादजीबाबांची तब्येत बिघडली. त्यांना सारखा ताप येत होता. अनेक वैद्यांनी त्यांच्यावर उपचार केले. परंतु त्याचा त्यांच्या तब्येतीवर काहीही उपयोग झाला नाही. ११ फेब्रुवारीला त्यांची तब्येत खूपच बिघडली व १२ फेब्रुवारी १७९४ साली महादजीबाबांची प्राणज्योत मावळली. ज्या महायोध्याच्या पराक्रमाच्या जोरावर मराठा साम्राज्याचा डामडौल उभा होता त्यांच्या निघून जाण्याने भक्कम आधारच हरवला. महादजीबाबांनी आपले पुतणे आनंदराव शिंदे यांच्या मुलाला म्हणजेच दौलतराव शिंदेंना दत्तक घेतले होते. वानवडी येथे पाटीलबाबांना मुखाग्नी देण्यात आला व दौलतराव शिंदेंनी महादजीबाबांचे अंतिमकार्य व्यवस्थितपणे पार पाडले.

पाटीलबाबांना ज्या ठिकाणी मुखाग्नी देण्यात आला त्याठिकाणी छोटेखानी समाधीछत्री बांधली. श्रीमंत दौलतराव शिंदेंना पेशव्यांच्या कडून समाधीछत्रीच्या देखभालीसाठी व खर्चास मौजे उरली प्रांत पुणे हा गाव देण्यात आला.

दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी लिहलेल्या 'पुना इन बायगोन डेज' पुस्तकामध्ये समाधीछत्री बाबत माहिती आहे, जेव्हा सर जेम्स मॅकिन्टोश या इंग्रजाने १८०५ साली पाटीलबाबांच्या छत्रीला भेट दिली त्यावेळी त्याने आपल्या डायरी मध्ये छत्रीचे वर्णन केले आहे.ते पुढील प्रमाणे-"आम्ही स्मारकाला जेव्हा भेट दिली तेव्हा ती बनण्यास सुरुवात झाली होती (बांधकाम चालू असावे). स्मारक छोटेसे असून दगडी बांधकाम खूप कौतुकास्पद आहे. स्मारकाजवळच एक छोटीशी सुंदर झोपडी असून या ठिकाणी रक्षा ठेवण्यात आली आहे.या ठिकाणी काही काळासाठी सरदार मंडळी जमा होतात.या परिसरात छोटे शिवालय आहे.या ठिकाणी महादजी शिंदे यांचे चित्र ठेवण्यात आले असून त्यासमोर दिवे निरंतर जळत राहतील, अशी व्यवस्था केली आहे.

पुढे ग्वाल्हेरनरेश माधवराव शिंदे (पहिले) यांनी समाधीछत्रीचा बराच विस्तार केला. स्मारकाच्याभोवती संरक्षण भिंत उभारण्यात आली. १९१५ साली महादेवाच्या मंदिरासमोर उभारण्यात आलेली नूतन इमारत राजस्थानी व ब्रिटिश स्थापत्यकलेची आठवण करून देते. या वास्तूच्या पायऱ्या, कोरीव नक्षीकाम व आतील भागात उभे असणारे खांब आणि त्यावरील सुंदर कलाकारी थक्क करणारी आहे. आतील बाजूस असणारे काचेचे भले मोठे झुंबर छत्रीच्या वैभवात अजूनच भर घालते. छत्रीचा परिसर प्रशस्त असून विठ्ठल-रुख्मिणीचे छोटे मंदिर आतील बाजूस आहे. एकंदरीत छत्रीचे वातावरण प्रसन्न आहे. छत्रीच्या प्रवेशद्वारासमोरच हनुमानजींचे मंदिर असून माधवराव शिंदेंच्या(पहिले) यांच्या कार्यकाळातच हे बांधण्यात आले. समाधी छत्रीच्या उजव्या बाजूस महादजीबाबांचे गुरू मन्सूरशहाअली बाबा यांचा दर्गा आहे.

ग्वाल्हेरच्या पंचांगानुसार दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात सिंधिया देवस्थान ट्रस्ट मार्फत महादजीबाबांची पुण्यतिथी साजरी करण्यात येते.यादिवशी पालखीतून महादजीबाबांची मिरवणूक काढण्यात येते. वारकरी संप्रदायाची दीक्षा घेणाऱ्या महादजीबाबांच्या स्मृतीप्रित्यर्थ भजन, कीर्तन, प्रवचन तसेच इतर सामाजिक कार्यक्रम सिंधिया देवस्थान ट्रस्टकडून राबविले जातात.

पानिपतच्या युद्धात मराठा साम्राज्याची मोठी हानी झाली. परंतु या अपयशाने खचून न जाता मराठा साम्राज्याला आपल्या अथक परिश्रमातून, बुद्धीचातुर्याने, प्रबळ महत्त्वाकांक्षेने आणि मोठ्या प्रतिकूल परिस्थितीत पुन्हा उभारी देण्याऱ्या या सामर्थ्यशाली, महासेनानीची वानवडी येथील समाधी छत्री केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानासाठी एक प्रेरणास्रोत व ऊर्जास्रोत आहे.

श्रीमंत महाराजा महादजी शिंदे सरकार यांच्या पवित्र्य स्मृतीस दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन!

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# क्रांती, विचार आणि वादळांचे व्यक्तिमत्त्व : स्वातंत्र्यवीर सावरकर



पुण्यतिथी विशेष

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

२६ फेब्रुवारी हा दिवस स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीचा. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील धगधगते क्रांतिकारक, प्रभावी लेखक, प्रखर राष्ट्रवादी विचारवंत आणि सामाजिक सुधारणावादी अशी त्यांची बहुआयामी ओळख आहे. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आढावा घेताना भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते.

### प्रारंभिक जीवन आणि क्रांतिकार्याची सुरूवात

२८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे सावरकरांचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांच्यात देशभक्तीची ज्वाला प्रज्वलित होती. शालेय जीवनात त्यांनी 'मित्रमेळा' ही संघटना स्थापन केली, जी पुढे 'अभिनव भारत' म्हणून ओळखली जाऊ लागली. पुण्यातील फर्ग्युसन कॉलेज येथे शिक्षण घेताना त्यांच्या विचारांना अधिक धार आली. पुढे कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी ते लंडनला गेले आणि तेथे इंडिया हाउस या क्रांतिकारकांच्या केंद्राशी त्यांचा संबंध आला.

लंडनमध्ये असताना त्यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरावर संशोधन करून 'दि इंडियन वार ऑफ इन्डिपेन्डन्स १८५७' हा ग्रंथ लिहिला. त्या काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध इतक्या स्पष्ट शब्दांत लिहिणे हे अत्यंत धाडसी पाऊल होते.

### अटक आणि काळ्या पाण्याची शिक्षा

१९१० मध्ये त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर त्यांना अंदमानातील सेल्युलर जेल येथे दोन जन्मठेपांची शिक्षा सुनावण्यात आली. 'काळे पाणी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शिक्षेमध्ये त्यांनी अमानुष हालअपेष्टा सहन केल्या. सेल्युलर जेलमध्ये त्यांनी विपरीत परिस्थितीतही लेखन सुरू ठेवले. भिंतींवर कविता कोरून त्या पाठ केल्याची कथा आजही प्रेरणादायी मानली जाते.

### सामाजिक सुधारणा आणि हिंदुत्वाची मांडणी

रत्नागिरीत नजरकैदेत असताना सावरकरांनी सामाजिक सुधारणेवर भर दिला. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांनी पतितपावन मंदिराची स्थापना केली, जे सर्व जातींना खुले होते. त्यांनी 'हिंदुत्व' ही संकल्पना मांडली. त्यांचे 'हिंदुत्व : 'हू इज ए हिंदू?' हे पुस्तक राष्ट्र, संस्कृती आणि इतिहास यांची विशिष्ट व्याख्या करते. त्यांच्या या विचारांभोवती आजही व्यापक चर्चा आणि मतभेद आढळतात.

### राजकीय वाटचाल आणि वाद

सावरकर पुढे हिंदू महासभा चे अध्यक्ष झाले. त्यांच्या राजकीय भूमिकांवरून त्यांच्यावर टीका आणि समर्थन दोन्ही झाले. महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आले होते; मात्र न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली. तरीही हा विषय आजही वादाच्या केंद्रस्थानी राहिला आहे.

### साहित्यसंपदा आणि वैचारिक ठेवा

सावरकर केवळ क्रांतिकारक नव्हते, तर ते प्रतिभावान कवी आणि लेखकही होते. 'कमला', 'सागरप्राण तळमळला', 'जयस्तुते' यांसारख्या रचना आजही लोकप्रिय आहेत. त्यांच्या लेखनातून राष्ट्रभक्ती, स्वाभिमान आणि सामाजिक जागृती यांचा प्रभावी संदेश उमटतो.

### आत्मार्पण आणि स्मरण

२६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांनी 'आत्मार्पण' स्वीकारले. आपल्या जीवनकार्याची पूर्तता झाल्याची भावना व्यक्त करून त्यांनी अन्न-जल त्याग केला.

त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे कार्य, त्याग आणि विचार यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सावरकरांचे व्यक्तिमत्त्व हे एका चौकटीत बसणारे नव्हतेते क्रांतीचे प्रतीक होते, पण त्याचबरोबर वादांचेही केंद्र होते. विनायक दामोदर सावरकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, साहस आणि विचारप्रखरतेचा प्रवास. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना इतिहासाकडे वस्तुनिष्ठ नजरेने पाहणे गरजेचे आहे.


**त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाला दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन..!**

# मास्टर शहीद अमीरचंद की कहानी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सामने जवान बेटे की निर्जीव देह पड़ी थी और एक अंग्रेज अफसर ने ठंडी आवाज़ में कहा "बस एक बार कह दे कि ये तेरा बेटा है फिर इसे अग्नि देने की इजाजत मिल जाएगी।" उस एक वाक्य ने जैसे एक बाप के सीने को चीर दिया, लेकिन जो जवाब आने वाला था उसने इतिहास को हमेशा के लिए बदल दिया। यह कहानी है उस पिता की जिसने अपने दिल को पत्थर बना लिया, लेकिन देश का सिर झुकने नहीं दिया। यह कहानी है मास्टर अमीरचंद की, जिनका नाम आज भी बहुत कम लोग जानते हैं, लेकिन जिनका त्याग किसी भी बड़े बलिदान से कम नहीं था।

८ मई १९१५ दिल्ली की जेल और एक ऐसा दृश्य, जिसे याद कर आज भी रूह कांप जाती है। एक तरफ अंग्रेजों का अत्याचार था दूसरी तरफ एक पिता का अटूट साहस। मास्टर अमीरचंद पेशे से एक साधारण अध्यापक थे, लेकिन उनके भीतर आज़ादी की ऐसी ज्वाला जल रही थी जो हर डर को खत्म कर दे। लाला हरदयाल और रासबिहारी बोस जैसे क्रांतिकारी भी उन्हें सम्मान से देखते थे। जब लॉर्ड हार्डिंग पर बम फेंकने की योजना बनी, तो उस योजना के पीछे



उनकी भूमिका भी अहम थी।

अंग्रेजों ने उन्हें गिरफ्तार कर लिया। लेकिन उनकी निर्दयता यहीं नहीं रुकी उन्होंने उनके जवान बेटे को भी पकड़ लिया। उस मासूम को इतनी क्रूर यातनाएँ दी गईं कि उसने जेल की अंधेरी कोठरी में ही दम तोड़ दिया। एक पिता के लिए इससे बड़ा दुःख क्या हो सकता है? अंग्रेजों को लगा कि अब वो टूट जाएंगे। उन्होंने सोचा कि जब एक बाप अपने बेटे की लाश देखेगा तो वह सब कुछ बता देगा। वे उन्हें उस कोठरी में ले गए जहाँ उनका बेटा निर्जीव पड़ा था ठंडा खामोश और हमेशा के लिए दूर।

उस पल जैसे समय ठहर गया। एक पिता की नजर अपने बेटे के चेहरे पर टिक गई। वही चेहरा जिसे उसने कभी अपने हाथों से सहलाया था, जिसे उसने अपने कंधों पर बैठाकर दुनिया दिखाई थी। आँखें नम हो उठीं दिल भीतर ही भीतर चीख पड़ा लेकिन होंठ अब भी खामोश थे। अंग्रेज अफसर ने फिर कहा "बस मान लो कि ये तुम्हारा बेटा है इसे सम्मान से अंतिम संस्कार दे दो।" वह चाहते थे कि एक पिता की ममता उसकी मजबूती को तोड़ दे। लेकिन उस दिन एक पिता नहीं, एक क्रांतिकारी खड़ा था। उन्होंने अपनी आँखों के आँसू अंदर ही रोक लिए और पत्थर जैसे स्वर में कहा "यह मेरा बेटा नहीं है मैं इसे नहीं पहचानता।"

उस एक वाक्य में एक पिता का पूरा दिल टूट गया लेकिन देश का सिर ऊँचा हो गया। उन्हें पता था कि अगर आज वह भावनाओं में बह गए, तो उनके साथियों की जान खतरे में पड़ जाएगी और आज़ादी की लड़ाई कमजोर पड़ जाएगी। इसलिए उन्होंने अपने ही बेटे को दुनिया के सामने "लावारिस" बना दिया। सोचिए कैसा दिल होगा उस इंसान का? जिसने अपने खून को भी देश के लिए त्याग दिया जिसने अपने ही जिगर के टुकड़े को पहचानने से इनकार कर दिया ताकि देश की लड़ाई जिंदा रहे।


८ मई १९१५ फांसी का दिन भी आ गया। जब उन्हें फांसी के फंदे की ओर ले जाया जा रहा था, तो उनके चेहरे पर डर नहीं बल्कि एक अजीब सी शांति थी। जैसे उन्होंने सब कुछ पहले ही त्याग दिया हो। उन्होंने फंदे को देखा उसे चूमा और अंतिम बार कहा "मैंने अपना सब कुछ भारत माता को दे दिया अब यह जीवन भी उसी का है।" और फिर एक और बलिदान इतिहास के पन्नों में दर्ज हो गया। लेकिन समय के साथ हम उस नाम को भूलते चले गए उस दर्द को भूलते चले गए उस त्याग को भी, जिसने हमें आज़ादी की सांस दी। आज सवाल सिर्फ इतना है जिस बाप ने अपने बेटे के शव को छूने का अधिकार तक छोड़ दिया, ताकि हम आज खुले आसमान में सांस ले सकें क्या हम उसका नाम भी याद रखते हैं?

अगर यह कहानी पढ़कर आपके दिल में भी हलचल हुई हो तो इसे यूं ही मत जाने दीजिए। इस महान पिता को एक सलाम जरूर लिखिए, "वंदे मातरम्" जरूर कहिए, और इस कहानी को आगे बढ़ाइए क्योंकि शहीदों को सच्ची श्रद्धांजलि शब्दों से नहीं, याद रखने से मिलती है।

# घर-संसार सांभाळून ४० व्या वर्षी क्रॅक केली परीक्षा; आता बनली क्लास-वन अधिकारी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

स्वप्न पूर्ण करण्यासाठी वयाची कोणतीही मर्यादा नसते, फक्त तुमच्यात ते पूर्ण करण्याचे धाडस हवे; मग ध्येय स्वतःच मार्ग मोकळे करते. या ओळी दीपा भाटी यांच्या आयुष्याला तंतोतंत लागू पडतात. ३ मुलांची आई, घराची जबाबदारी आणि समाजाचे टोमणे अशा सर्व परिस्थितीवर मात करत दीपा यांनी वयाच्या ४० व्या वर्षी अधिकारी होण्याचे स्वप्न सत्यात उतरवले आहे.



सक्सेस स्टोरी

### लहान वयात लग्न आणि शिक्षणात खंड

दीपा भाटी या मूळच्या उत्तर प्रदेशातील नोएडाच्या रहिवासी आहेत. त्यांनी रसायनशास्त्रात पदवी आणि इतिहासात पदव्युत्तर पदवी (एम.ए.) मिळविली आहे. दीपा यांचे लग्न अगदी लहान वयातच झाले होते. लग्नानंतर घराची जबाबदारी आणि पाठोपाठ ३ मुले झाल्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला. मात्र, काहीतरी मोठे करून दाखविण्याची त्यांची इच्छा कायम जीवंत होती.

### शिक्षिकेची नोकरी आणि संघर्षाला सुरूवात

संसार आणि मुलांच्या संगोपनात व्यस्त असतानाच दीपा यांनी एका खासगी शाळेत शिक्षिका म्हणून नोकरी सुरू केली. मात्र, काही कारणास्तव त्यांना ती नोकरी सोडावी लागली. याच काळात त्यांच्या भावाने त्यांना नागरी सेवा परीक्षेचा मार्ग दाखविला आणि यूपीपीसीएस परीक्षा देण्याचा सल्ला दिला. तीन मुलांचे संगोपन आणि घरातील कामे सांभाळून अभ्यास करणे सोपे नव्हते, पण दीपा यांनी हार मानली नाही.

### टोमणे सहन केले पण जिद्द सोडली नाही

जेव्हा दीपा यांनी पुन्हा पुस्तके हातात घेतली, तेव्हा समाजातील अनेकांनी त्यांना टोमणे मारले. 'आता पोरे मोठी झाली, आता काय अभ्यास करतेस?' अशा शब्दांत त्यांची थट्टा करण्यात आली. मात्र, दीपा यांनी या टोमण्यांकडे दुर्लक्ष केले. त्या दिवसभर घरकाम करायच्या आणि मिळेल त्या वेळेत स्वतःला अभ्यासात झोकून द्यायच्या.

### वयाच्या ४० व्या वर्षी मिळविले यश

लग्नाच्या १८ वर्षांनंतर आणि अहोरात्र घेतलेल्या परिश्रमानंतर अखेर दीपा यांचे स्वप्न पूर्ण झाले. वयाच्या ४० व्या वर्षी त्यांनी यूपीपीसीएस परीक्षा उत्तीर्ण केली. १६६ व्या क्रमांकासह त्यांची अधिकारी पदावर निवड झाली. विशेष म्हणजे २०२१ मध्ये जेव्हा त्या परीक्षा उत्तीर्ण झाल्या तेव्हा त्यांची मोठी मुलगी १२ वीत शिकत होती. आज दीपा भाटी यांची ही संघर्षगाथा लाखो गृहिणी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरली आहे.

'व्हॉट्सअप'च्या वाढदिवसानिमित्त....

# जगातील सर्वाधिक वापराचे मेसेजिंग ॲप्लिकेशन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जेन कॉम याने २४ फेब्रुवारी २००९ रोजी 'व्हॉट्सॲप आयएनसी' या नावाने एक कंपनीची स्थापना केली. हे जगातील सर्वाधिक वापरले जाणार मेसेजिंग ॲप्लिकेशन आहे. आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये दुसरे कोणते ॲप्लिकेशन असो किंवा नसो. पण व्हॉट्सॲप हमखास बघायला मिळते. आज जगभरात १२५ कोटींहून अधिक लोक आपल्या दैनंदिन जीवनात 'व्हॉट्सॲप'चा उपयोग करतात.

'व्हॉट्सॲप' याचा इंग्लिशमध्ये अर्थ होतो 'काय सुरू आहे?' या पाश्चिमात्य देशातील प्रसिद्ध शब्दामुळे 'व्हॉट्सॲप' हे नाव या ॲप्लिकेशनचे ठेवण्यात आले. व्हॉट्सॲप वापरणारे जगात सर्वाधिक लोक भारतात आहेत. व्हॉट्सॲप टीममध्ये ५५ इंजिनिअर काम करतात. यामध्ये एक इंजिनिअर एक कोटी ८० लाख वापरकर्त्यांना हॅन्डल करतो. व्हॉट्सॲपवर रोज ४३०० कोटी मेसेज सेंड होतात. तसेच रोज शेअर होणाऱ्या फोटोंची संख्या १६० कोटी आहे. व्हिडिओंची संख्या २५ कोटी आहे.

व्हॉट्सॲपचा वापर आपण ५३ भाषांमध्ये करू शकतो. महिन्याला ॲक्टिव्ह




वापरकर्ते १०० कोटी आहेत जे फेसबुक मेसेंजरपेक्षाही अधिक आहे. व्हॉट्सॲपवर ग्रुपची संख्या १०० कोटींपेक्षाही अधिक आहे. व्हॉट्सॲपने स्वतःच्या प्रसिद्धीकरिता जाहिरातींवर रुपयासुद्धा खर्च केला नाही तरी ते एवढे लोकप्रिय आहे. जगात सर्वाधिक डाऊनलोड होणाऱ्या ॲपपैकी व्हॉट्सॲप हे पहिल्या नंबरचे ॲप आहे. व्हॉट्सॲप 'नो ॲड पॉलीसी'वर काम करते. त्यामुळे व्हॉट्सॲपवर तुम्हाला कुठल्याही कंपनीची जाहिरात दिसत नाही.

### व्हॉट्सॲपचा इतिहास

व्हॉट्सॲपची सुरूवात जेन कॉम याने केली. त्यांचा जन्म युक्रेन या देशातील छोट्याशा गावात झाला. त्यांची आई गृहिणी आणि वडील मजूर होते. त्या काळी युक्रेनमध्ये राजकीय परिस्थिती ठीक नसल्याने त्यांच्या आई-वडिलांनी तेथून अमेरिकेत स्थलांतरित होण्याचा निर्णय घेतला. ते त्यांचे आई-वडील सगळे अमेरिकेतील कॅलिफोर्निया या शहरात राहायला आले. तेथे त्यांच्या आई-वडिलांनी छोटी-मोठी कामे करून घरचा आणि जेन यांच्या शिक्षणाचा खर्च भागविला. जेन कॉम यांना लहानपणापासूनच कॉम्प्युटर प्रोग्रामिंगमध्ये खूप रस होता. परंतु आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना कॉम्प्युटर विकत घेणे परवडत नव्हते. १९ व्या वर्षी त्यांनी पैसे जमा करून स्वतःसाठी एक कॉम्प्युटर विकत घेतला आणि आपल्या घराजवळील लायब्ररीमधून प्रोग्रॅमिंगची पुस्तके आणून घरच्या घरी प्रोग्रॅमिंग शिकू लागले. यानंतर त्यांनी कॉम्प्युटर सायन्समधून आपली डिग्री पूर्ण केली आणि एका कंपनीमध्ये सिक्युरिटी टेस्टरच्या पदावर काम करू लागले.

१९९७ मध्ये याहू या कंपनीत त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर इंजिनिअर या पदावर नोकरी मिळाली. तेथे त्यांची ओळख ब्रायन अक्टन यांच्याशी झाली. दोघांनी मिळून ९ वर्षे याहू कंपनीमध्ये नोकरी केल्यानंतर फेसबुकमध्ये नोकरी करूया, असे ठरवून याहूच्या नोकरीचा राजीनामा दिला. परंतु फेसबुकमध्ये नोकरीसाठी आवेदन दिल्यानंतर त्यांना तेथे रिजेक्ट करण्यात आले.

दुसऱ्याकडे नोकरी करण्यापेक्षा आपण आपली स्वतःची कंपनी सुरू करू, असे दोघांनी ठरवले. आणि त्या हिशेबाने पैसे जमवायला सुरूवात केली. त्यावेळी ॲपल कंपनीने त्यांचा पहिला आयफोन बाजारात आणला होता, परंतु त्यात आपल्या नातेवाईक आणि मित्रांना मेसेज पाठविणे हे खूप खर्चिक होते. याचवेळी त्यांना व्हॉट्सॲपची कल्पना सुचली आणि दोघांनी मिळून व्हॉट्सॲप हे नवीन मेसेजिंग ॲप बनवायला सुरूवात केली. सुरूवातीला याहूमध्ये काम करणाऱ्या त्यांच्या काही मित्रांनी मिळून कंपनीसाठी अडीच लाख डॉलर्सचा फंड गोळा केला आणि २४ फेब्रुवारी २००९ ला 'व्हॉट्सॲप आयएनसी' या नावाने एक कंपनीची स्थापना केली.

सुरूवातीला त्यांनी जवळच एक ऑफिस कंपनीसाठी भाड्याने घेतले. तेथे हिटरची व्यवस्था नसल्याने ते आणि त्यांचे सहकारी ऐन थंडीत दिवसातील १६ तास काम करायचे. सुरूवातीच्या दिवसांत व्हॉट्सॲपचा इन्कम महिन्याला फक्त ५००० डॉलर्स इतकाच होता. परंतु २०११ ला जेव्हा त्यांनी अँड्रॉइड मोबाईलसाठी आपले व्हॉट्सॲप लाँच केले तेव्हा त्यांचा इन्कम दोन वर्षात २० पटींनी वाढला आणि त्यांचे ॲप प्ले स्टोअरमध्ये २० व्या क्रमांकाचे ॲप बनले.

२०१४ मध्ये व्हॉट्सॲपचा प्रभाव एवढा वाढला की फेसबुकचे संस्थापक मार्क झुकरबर्ग यांना फेसबुक मेसेंजरची लोकप्रियता कमी होते की काय याची भीती वाटू लागली. यानंतर मार्क झुकेरबर्ग यांनी २०१४ मध्ये जेन कॉम यांच्याशी संपर्क करून व्हॉट्सॲपला विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली आणि जेन कॉम यांना मार्क यांचा हा प्रस्ताव आवडला. यानंतर मार्क झुकेरबर्ग यांनी १९ बिलियन डॉलर्सला व्हॉट्सॲप खरेदी केले आणि जेन कॉम आणि ब्रायन अक्टन यांना कंपनीचे शेअर देऊ केले. जगाच्या इतिहासातील हा सर्वात मोठा सौदा मानला जातो.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी




एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




## ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांची शिष्य परंपरा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ महाराजांची शिष्य परंपरा. त्यांचे शिष्य बघून तुम्हाला स्वामी महाराजांच्या अधिकाराची जाणीव नक्की होईल. कारण आज त्यांच्या शिष्यांची मंदिरे आहेत. त्यांच्या शिष्यांची पूजा केली जाते. मग विचार करा अशा शिष्यांचा गुरू कसा असेल?

श्री कृष्णसरस्वती (१८३६-१९००), कोल्हापूर
श्री बाळप्पा (१८३६-१९१०), अक्कलकोट
श्री रामानंद बिडकर (१९३९-१९१३), पुणे
श्री नृसिंहसरस्वती, आळंदी
श्री वामनबुवा वाम्बोरीकार (१८४८-१९०१), बडोदा
श्री ठाकूरदासबुवा, ठाकूरद्वार मुंबई
श्री चोळप्पा, अक्कलकोट
श्री तातमहाराज, मुंबई
श्री गोपाळबुवा केळकर, (१८४७-१९१९) चिपळूण
श्री देव मामलेदार (१८१५-१८८७), नाशिक
श्री आनंदनाथ महाराज, वेंगुर्ले
श्री लक्ष्मण कोळी (आनंद भारती), ठाणे
श्री रांगोळी महाराज, कोल्हापूर
श्री जमादार, मैदर्गी
श्री स्वामीसुत तथा हरिभाऊ, मुंबई
श्री सीतारामबुवा, मंगळवेढा
श्री सच्चिदानंद स्वामीकुमार, मुंबई
श्री बाबा घोलप (१८२५-१८८८), नाशिक
श्री काळबुवा (१८२४-१८८४), पंढरपूर व पुणे
श्री मायुरानंद सरस्वती, सोपारा
श्री नाना रेखी (१८२८-१९१२), अहमदनगर
श्री शंकर महाराज, पुणे
श्री गजानन महाराज, शेगाव
श्री साई बाबा (१८३८-१९१८), शिरडी
श्री बावडेकर बुवा, बार्शी
श्री कैवाल्याश्रम स्वामी, गुर्लहोसूर
श्री सच्चिदानंद महाराज (१८६०-१९३४), पंढरपूर
श्री श्रीपती बाबा महाराज, महाळुंगे
श्री जंगली महाराज, पुणे
श्री दास गोपाळकृष्ण स्वामी, हुपरी

यातील बहुतांश जणांनी स्वामी महाराज अक्कलकोट आणि त्याच्या आसपासच्या परिसरात वास्तव्यास असताना शिष्यत्व स्वीकारले होते. पण त्याच्या आगोदर स्वामी महाराजांनी शिष्य जे बनवलेत त्यांची येथे नुसती नावे जरी द्यायची म्हटली तरी ती खूपच मोठी होईल. जेव्हा स्वामी महाराज एखाद्याला आपले शिष्यत्व (अनुग्रह) प्रदान करायचे तेव्हा त्याला एक गोष्ट सांगायचे की आता तू परत अक्कलकोटला यायचे नाही. आम्ही फक्त अक्कलकोटपुरते मर्यादित नसून आम्ही सर्व ब्रह्मांडात व्यापून आहे. त्यामुळे येथून पुढे तू स्मरण करशील त्या क्षणी आम्ही तुझ्यापाशी असू. आपल्याला स्वामींचे निरंतर सान्निध्य हवे असेल, तर खूपच सोपा मार्ग 'श्री स्वामी समर्थ' या जादुई मंत्राचे अखंड नामस्मरण करावे.

# आमलकी एकादशीचा मुहूर्त २६ की २७ फेब्रुवारी?

## उज्जैनच्या ज्योतिषतज्ज्ञांकडून जाणून घ्या; कसा असतो शास्त्रोक्त पूजाविधी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या फाल्गुन महिना सुरू आहे. या महिन्यातील शुक्ल पक्षात येणाऱ्या आमलकी एकादशीच्या तारखेवरून भाविकांमध्ये मोठा संभ्रम पाहायला मिळत आहे. हे व्रत नक्की गुरुवार, दि. २६ फेब्रुवारीला करायचे की शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी २०२६ ला, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. या संदर्भात उज्जैनच्या ज्योतिषतज्ज्ञांनी सविस्तर माहिती देत योग्य तारीख, शुभ मुहूर्त आणि शास्त्रोक्त पूजाविधी स्पष्ट केला आहे.

### कधी आहे आमलकी एकादशी?

उज्जैनच्या तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार पंचांग गणनेच्या आधारे फाल्गुन शुक्ल एकादशी तिथीची सुरूवात २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री (२७ तारखेच्या पहाटे) १२ वाजून ३३-३४ मिनिटांनी होणार आहे. तर या तिथीची सांगता दुसऱ्या दिवशी म्हणजेच २७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजून ३२-३३ मिनिटांनी होईल. हिंदू पंचांग आणि शास्त्रांनुसार कोणतेही व्रत किंवा सण साजरा करण्यासाठी 'उदय तिथी' (सूर्योदयाची वेळ)



अत्यंत महत्त्वाची मानली जाते. २७ फेब्रुवारी रोजी एकादशी तिथी सूर्योदयाला स्पर्श करत असल्यामुळे आमलकी एकादशीचे व्रत शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ रोजीच ठेवणे सर्वथा योग्य आणि शास्त्रसंमत ठरेल.

### पूजेचा शुभ मुहूर्त आणि शास्त्रोक्त विधी

या एकादशीला आवळ्याचे (आमलकी) विशेष महत्त्व असते. तज्ज्ञांनी सुचविलेल्या पूजाविधीनुसार भाविकांनी एकादशीच्या दिवशी पहाटे लवकर उठून स्नान करावे आणि स्वच्छ वस्त्र परिधान करून व्रताचा संकल्प सोडावा. पूजेसाठी एका स्वच्छ चौरंगावर भगवान श्रीहरी विष्णूंची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करावी. देवाला पिवळ्या रंगाची वस्त्रे, फळे, फुले, चंदन, धूप-दीप आणि विशेष करून आवळा अर्पण करावा.

या दिवशी भगवान विष्णूंच्या पूजेसोबतच आवळ्याच्या झाडाची पूजा करण्याचे मोठे महत्त्व शास्त्रात सांगितले आहे. आवळ्याच्या झाडावर भगवान विष्णूंचा वास असतो, अशी मान्यता आहे. त्यामुळे आवळ्याच्या झाडाला जल अर्पण करून त्याची मनोभावे पूजा केल्यास श्रीहरी लवकर प्रसन्न होतात आणि भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करतात. संपूर्ण दिवस श्रद्धेने उपवास केल्यानंतर, दुसऱ्या दिवशी म्हणजेच द्वादशीला योग्य शुभ मुहूर्तावर या व्रताचे पारण करावे (उपवास सोडावा). अशा प्रकारे उज्जैनच्या तज्ज्ञांनी दिलेल्या सल्ल्यानुसार भाविकांना योग्य तारखेला व्रत आणि विधिवत पूजा करून श्रीहरीची कृपा प्राप्त करता येईल.

# मढीतील श्रीक्षेत्र चैतन्य कानिफनाथ महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मढी (ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर) येथे श्रीक्षेत्र चैतन्य कानिफनाथ महाराजांच्या संजीवनी समाधीला तेल लावणे हा पारंपरिक विधी मोठ्या भक्तिभावात व उत्साहात संपन्न झाला. शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी दरवर्षीप्रमाणे दुपारी ४ वाजता देवस्थानचे अध्यक्ष/विश्वस्त, मढी ग्रामस्थ व नाथभक्तांच्या उपस्थितीत नाथांच्या पादुकांचा जलाभिषेक करण्यात आला. नंतर शंख व नगारा वाद्याच्या गजरात 'श्री कानिफनाथ महाराज की जय' म्हणत पारंपरिक पद्धतीत नाथांना तेल लावण्यात आले. यात्रेपूर्वीचा हा महत्त्वाचा विधी मानला जातो. प्रमुख कार्यक्रम १५ मार्च २०२६ रोजी मानाची कैकाड्याची काठी आणि गोपाळ समाजाच्या मानकऱ्यांच्या हस्ते होळी पेटविली जाईल.

या पवित्र दिवशी कानिफनाथ महाराज गादीवर ध्यानस्थ बसतात. त्यामुळे तेल लागल्यापासून गुढीपाडव्यापर्यंत नाथांच्या सजीवनी समाधी उत्सवाचा पर्वकाळ असल्याने मढी व निवडुंगे या गावांमध्ये गावकरी विविध





व्रतबंधने पाळतात. यात नवीन कार्यास आरंभ करणे, शेतीची नांगरटी इत्यादी कामे, लग्नाची बोलणी करणे, तसेच शुभविवाह, वास्तुशांती इत्यादी मंगलकार्य करणे, गादी व पलंगावर शयन करणे, दाढी करणे, तसेच घरामध्ये पदार्थ तळणे, दाराची चौकट बसविणे ही कामे वर्ज्य केली जातात. नाथांच्या संजीवनी समाधी भव्य दिव्य यात्रा उत्सवाचा काळ असल्याने या काळात नियम व पावित्र्य सांभाळून कानिफनाथ महाराजांची सेवा करता यावी यासाठी ही परंपरा सुरू आहे. ही शेकडो वर्षांची परंपरा आहे. नाथसंप्रदायाचे आद्यस्थान व भटक्यांची पंढरी म्हणून श्रीक्षेत्र मढी येथील यात्रा देशात प्रसिद्ध आहे. या यात्रेत अठरापगड जाती-धर्माच्या समाजाला मान दिला जातो. मढीची प्रसिद्ध रेवडी, गाढवांचा बाजार, मानाची काठी ही यात्रेची वैशिष्ट्ये आहेत. होळी ते गुढीपाडवा दरम्यान ही भव्य यात्रा असते. रंगपंचमी हा यात्रेचा मुख्य दिवस असतो.

# काशीतील दत्त क्षेत्र मुक्तीसाठी पूजनीय

**ग्लोबल महादेव वृत्तसेवा**

काशी (वाराणसी) हे भगवान शिव यांचे पवित्र शहर असून, तेथे अनेक पौराणिक स्थळे आहेत. याच काशी क्षेत्रात दत्त महाराजांचे प्राचीन मंदिर ब्रह्म घाटावर आहे, जेथे श्री नृसिंह सरस्वतींनी तपश्चर्या केली होती. या क्षेत्रात दत्त महाराजांचे वास्तव्य महत्त्वाचे मानले जाते. ज्यामुळे काशीला 'दत्त क्षेत्र' म्हणूनही ओळखले जाते आणि हे ठिकाण मुक्तीसाठी अत्यंत पूजनीय आहे.

### धार्मिक महत्त्व

हे हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र स्थान आहे. येथे मृत्यू पावणाऱ्याला मोक्ष मिळतो, अशी श्रद्धा आहे.

### विश्वनाथ मंदिर

काशी हे भगवान विश्वनाथांचे (शिवाचे) स्थान आहे, आणि हे शहर भगवान शिव यांनी त्रिशुळावर धारण केले आहे, असे मानले जाते.

### दत्त महाराज आणि काशी

दत्त महाराजांचे दुसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती यांनी काशीमध्ये १२ वर्षे वास्तव्य केले होते आणि तेथे दीक्षा घेतली होती, असे मानले जाते.

### ब्रह्म घाटावरील मंदिर

काशीमधील ब्रह्म घाटावर दत्तात्रयांचे एक प्राचीन आणि प्रसिद्ध मंदिर आहे. जेथे दर्शनाने रोग दूर होतात, अशी श्रद्धा आहे.




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भक्तांचे जरी असंख्य प्रकार असले, तरी त्यांची मुख्य चार प्रकारांत विभागणी केली जाते. हे चार प्रकार म्हणजे आर्त, अर्थार्थी, मुमुक्षु व साधक. चार प्रकारच्या या भक्तांची आपण माहिती घेऊया. यातून आपण कुठल्या प्रकारात मोडतो? याचाच विचार करायला हवा.

**१) आर्त –** आर्त म्हणजे दुःखी, गांजलेला, पिडलेला, विविध प्रकारच्या यातना भोगत असलेला. ग्रह दशेच्या फेऱ्यांमध्ये सापडलेला, रोगी, पिशाच्च बाधेने पीडित असलेला, दारिद्र्याने गांजेलेला, शत्रू ज्याला सतावत आहेत, असा निरपराध असून जेलमध्ये बंदिस्त, सासुरवास भोगणारी स्त्री. अशा प्रकारे अनेक प्रकारच्या दुःखांनी जे गांजेलेले आहेत व दुःखांच्या निवृत्तीसाठी जे परमेश्वराची आराधना करतात अशा सर्व भक्तांना आर्त म्हटले जाते.

**२) अर्थार्थी –** अर्थार्थी म्हणजे धन व सुखसंपदा यांची अपेक्षा करणारा मनुष्य, संसारामध्ये अनेक प्रकारच्या समस्या असतात. कधी पैसा पुरेसा पडत नाही, तर कधी मिळवलेला पैसा जातो कुठे? हेच समजत नाही. बरकत नसते, समाधान नसते. भरपूर कष्ट करूनही पैसा कमी मिळतो व भरपूर पैसा मिळाला तरी, पुन्हा कर्ज काढावे लागते. जे काम दोन दिवसात व्हायला पाहिजे ते दोन वर्षे झाले तरी होत नाही, धंद्यामध्ये सतत अपयश येते. विविध प्रकारच्या चिंतांनी मनुष्य व्याकुळ होतो, कोर्ट कचेऱ्या कराव्या लागतात. सरकारी दरबारी कामे लवकर होत नाहीत, अशा प्रकारे संसारिक आपदांनी विविध त्रासांनी त्रस्त होऊन जे परमेश्वराची भक्ती करू लागतात, अशा भक्तांना अर्थार्थी म्हटले जाते.

**३) मुमुक्षु –** ईश्वरप्राप्तीची ओढ ज्याला लागली आहे, ईश्वरप्राप्ती सोडून अन्य कशातही ज्याचे मन रस घेत नाही. आध्यात्म मार्गात प्रगती व्हावी अशी तळमळ ज्याला लागली आहे, अशा माणसाला मुमुक्षु असे म्हणतात.
जन्म मरणाच्या चक्रातून सुटावे असे ज्याला वाटते, मुक्ती किंवा जीवनमुक्ती काहीतरी आपल्याला प्राप्त करायचे आहे. असे ज्याच्या मनाने घेतले आहे, जो अखंड नामस्मरण करतो, ध्यान धारणा करतो, आपल्या मनाला ईश्वराच्या स्मरणामध्ये गुंतवून ठेवतो, सतत आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन करतो, अशा माणसाला मुमुक्षु म्हणतात.

**४) साधक –** एकाच आसनावर बसून न हलता न डुलता जो जप व ध्यान करतो त्याला साधक असे म्हणतात. काही साधक एखाद्या विशिष्ट मंत्राचा जप करून त्या मंत्रदेवतेला प्रसन्न करतात व त्या नंतर दुसऱ्या मंत्राचा जप करून दुसऱ्या देवतेला प्रसन्न करतात. अशा प्रकारे अनेक देव देवतांना साधक प्रसन्न करतात. जीवनामध्ये एक जरी देवता प्रसन्न झाली, तरी जीवन सफल होते. परंतु साधक अनेक देव देवतांना प्रसन्न करतात व विविध प्रकारचे ज्ञान त्यांच्याकडून प्राप्त करून घेतात. काही साधक विविध प्रकारच्या त्राटक साधना करतात आणि त्राटक साधनांद्वारे विविध प्रकारचे ज्ञान व सामर्थ्ये प्राप्त करतात. या साधकांना एका गोष्टीचा खुप मोठा धोका असतो. सिद्धी सामर्थ्ये मिळविण्याच्या नादामध्ये, साधकाला परमात्म्याचा विसर पडतो व त्याची अवस्था सांडोनिया आत्मसुख । सामर्थ्य वांछिती ते मुर्ख । अशी होते. म्हणून साधक ही अवस्था जरी चांगली असली तरी या अवस्थेमध्ये खुप धोके असतात. साधना ही परमात्म्याची एकरूप होण्यासाठी करायची असते. साधकाला ही पायरी प्राप्त झाल्यानंतर या गोष्टींचा विसर पडतो व साधक परमात्म्याशी एकरूप होण्याऐवजी विविध प्रकारची सामर्थ्ये प्राप्त करण्याच्या मागे लागतो. आणि तिथेच फसतो. एकदा का पाय घसरला, की या अवस्थेमध्ये सांभाळणारा कोणीही नसतो. येथे स्वतःच स्वतःला सांभाळायचे असते. असो.

काही साधक तर परमेश्वराची उपासना भक्ती करणे सोडून देतात आणि अघोरी कापालिक साधना सुरु करतात. अशा लोकांची अवस्था मृत्यूनंतर अतिशय भयंकर होते, लाखो वर्षे त्यांना अंधःकारमय अशा पिशाच्च योनीत काढावे लागतात. आत्म्याला खुप यातना भोगाव्या लागतात. परमेश्वराने दिलेल्या मानवी जीवनाचा त्यांनी दुरूपयोग केलेला असतो व त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावेच लागतात. काही साधक भाग्यवान असतात, ते कुठल्याही प्रकारच्या सिद्धी सामर्थ्याच्या भानगडीत पडत नाहीत. ते फक्त आत्म स्वरूपाचे ध्यान करतात किंवा परमेश्वराची भक्ती करत राहतात. स्वतःतील अहंकार व दुर्गुण नष्ट करण्याच्या प्रयत्न करतात. हळूहळू त्यांच्यातील अहंकार नष्ट होतो. त्यांच्यातील दुर्गुण नष्ट होतात, मनोलय साध्य होऊ लागतो, परमशांती व परमानंद यांची प्राप्ती होते. असे साधक जीवणमुक्त होतात त्यांना सिद्धावस्था प्राप्त होते. थोडक्यात, सिद्धावस्था एकदम प्राप्त येत नाही. अगोदर सद्सद्विवेकबुद्धी प्राप्त होते. आध्यात्म मार्गात धोके कुठे कुठे आहेत? याचे ज्ञान होते. हे धोके कसे टाळायचे? याचेही ज्ञान साधकाला आपोआप होऊ लागते. येथे त्याला हंस ही अवस्था प्राप्त होते. साधन मार्गातील सर्व धोके समजून घेऊन ते टाळण्याची क्षमता प्राप्त झाली की, हंस अवस्था प्राप्त होते. सर्व धोक्यांच्या पलीकडे गेल्यानंतर मनोलय अवस्थेमध्ये काही दिवस काढल्यानंतर परमहंस ही अवस्था प्राप्त होते. साधक हंस व परमहंस या अवस्थांचा एकांतामध्ये अनुभव घेतात व तेथे न थांबता पुढे वाटचाल करत राहतात. आणि सहजावस्था म्हणजे सिद्धावस्था प्राप्त करतात. येथे आध्यात्माचा प्रवास काही काळापुरता थांबतो, देह साधना करताना ते दिसत नाही. परंतु आत्मा आध्यात्मातील अनेक अवस्था प्राप्त करत राहतो, आणि सतत पुढे जातो. आज तागायत याचे रहस्य कुणालाही कळले नाही, हे विशेष!

# सुरक्षाकवच प्रदान करणारे 'संध्यावंदन'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेक घरांमध्ये लहान मुलांना रामरक्षा शिकविली जाते. रामरक्षा दीड हजार वेळा उच्चारली असता रामरक्षास्तोत्र सिद्ध होते आणि त्या मुलाभोवती एक सुरक्षाकवच निर्माण होते. साधारणतः पाच वर्षांमध्ये रामरक्षेचे दीड हजार आवर्तन सहज होऊ शकतात. म्हणजे पहिलीपासून जर मुलाला नित्य रामरक्षा म्हणायला सांगितली तर साधारणतः पाचवी-सहावीपर्यंत त्यांची १५०० आवर्तन पूर्ण होतात. मुलाच्या नकळत एक सुरक्षाकवच त्याच्या व्यक्तिमत्त्वाभोवती निर्माण होते. मुलांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक पालक काळजीत असतो आणि वर्तमान परिस्थितीमध्ये अनेक संकटांना मुला-मुलींना सामोरे जावे लागते. मुले-मुली घरी येईपर्यंत आईला काळजी असते. अशा असुरक्षित वातावरणात रामरक्षास्तोत्र मुलांना सुरक्षाकवच प्रदान करते. रामरक्षासोबत भीमरूपी हनुमानस्तोत्र म्हटले असता मुलांची शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमता शक्तिशाली, प्रतिभाशाली, तेजस्वी होते. कोणतेही मंत्रश्लोक प्रार्थना सुरक्षा प्रदान करतेच. परंतु त्यामध्ये विशेष 'रामरक्षास्तोत्र'विषयी शास्त्रात सांगितले आहे. डॉ. संजय उपाध्ये यांच्या निरूपणांत रामरक्षेचा सखोल अर्थ सांगितला आहे.

'फिजिक्स ॲण्ड केमिस्ट्री ऑफ ह्यूमन बॉडी' हे परदेशी शास्त्रज्ञांनी लिहिलेले पुस्तक आहे. त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे, की रोज ५ मिनिटे जरी मनापासून मंत्र श्लोक अशी साधना केली तर ३ महिन्यात रक्ताच्या सर्वच जुन्या पेशी



नाहीशा होतात आणि निर्माण होणाऱ्या नवीन रक्ताच्या पेशी या पहिल्या रक्ताच्या पेशीपेक्षा अधिक तेजस्वी, बलवान, शक्तिशाली, निरोगी तयार होतात. अशीच साधना ७ वर्षे केली असता हाडांपर्यंतच्या सर्वच पेशी बलवान, निरोगी तयार होतात. त्याचे शरीर पूर्णतः आजारमुक्त आणि निरोगी होऊ शकते. आपल्या देशातील महान ऋषीमुनी आणि सतपुरुषांनी ध्वनीच्या ठिकाणी असलेल्या सामर्थ्याला वैदिक काळापासून जाणले आहे. आजपर्यंत यासाठीच सर्वच संतांनी 'नामसाधना'चा महिमा जनमानसात रुजविण्याचा नित्य प्रयत्न केला आहे.

ज्यावेळी आपण ठराविक वेळेला, ठराविक कालावधी आणि ठराविक जागी ठरवून साधना करतो त्यावेळी ती साधना सिद्ध होते. यासाठी आपल्याला आवडेल असा अथवा सद्गुरूंनी दिलेले मंत्र, स्तोत्र, नामसाधना आपण करू शकतो. असे केल्याने आपल्या शरीरातील प्रत्येक पेशी, मन आणि बुद्धी शक्तिशाली होते. तसेच ते स्थानही शुद्ध होते. रशियामध्ये भारतीय मंत्र स्तोत्रांविषयी अनेक संशोधन झाले. त्यांनी भारतीयांकडून अनेक मंत्रश्लोकांचे रेकॉर्डिंग करवून घेतले. त्यामध्ये सिद्ध झाले आहे, की ओंकार आणि गायत्री मंत्र वातावरण शुद्ध करते. वातावरणात ऋणतत्त्व अधिक असतील तर वातावरण शुद्ध राहते आणि जर धनतत्त्व वाढले तर वातावरण दूषित होते. वातावरणात प्रदूषण वाढते. सर्वच मंत्रांच्या तुलनेत गायत्री मंत्र आणि ओंकाराच्या उच्चारामुळे वातावरणामध्ये ऋणतत्त्व अधिक प्रमाणात वाढतात, असे त्यांच्या संशोधनात सिद्ध झाले आहे.

अन्य धर्मात दिवसभरात ठराविक वेळी त्यांची प्रार्थना मोठ्याने म्हटली जाते. सृष्टीमध्ये अशी एक वेळ येईल, की भारतीयांचे मंत्रश्लोक जगाला २४ तास ऐकावे लागतील. आता ती वेळ आली आहे हे आपण सर्वजण अनुभवतो आहोत. आजची परिस्थिती पाहता प्रत्येक वयातील व्यक्तीलाच आपल्याभोवती सुरक्षाकवच निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

'संध्यावंदन' जीवनाचा अविभाज्य भाग बनविणे ही काळाची गरज आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)